**युनिट ५, गुन्हे शाखा, पुणे शहर आयुक्तालय दिनांक १५/०६/२०१९**

**प्रेस नोट**

## युनिट-५ गुन्हे शाखेचे हॉट स्पॉटचे प्रतिबंधक कारवाईत घरफोडी, वाहन चोरी व मोबाईल चोरीच्या वेगवेगळया गुन्हयातील सराईत गुन्हेगार केले जेरबंद

---ooo---

मा. वरिष्ठांचे आदेशाने पुणे शहरात वाहनचोरीचे गुन्हयात वाढ झालेली असल्याने प्रतिबंधात्मक कारवाई म्हणुन युनिट-५चे अधिकार क्षेत्रात दररोज वेगवेगळया ठिकाणी हॉट स्पॉट वर सापळे लावणयात आले होते. तसेच वानवडी पो. स्टे. गुन्हा रजि.नं. २५२/२०१९ भा.दं.वि.क. ४५७, ३८०, ३४ या गुन्हयाचे समांतर तपास करीत असताना सदर घरफोडी गुन्हयातील चोरीस गेलेला मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करुन व खास बातमीदारांमार्फतीने माहिती काढुन आरोपी नामे शिवप्रसाद उर्फ शिवा राजु कैंची, वय – १९ वर्षे, रा. नवीन घरकुल, घर नं. ३८२/३/ख, कुंभारी, दक्षिण सोलापुर, जि. सोलापुर यास यापुर्वी अटक करुन त्याचा साथीदार हा अक्षय आंबादास सामलेटी असलेबाबत त्याचेकडुन माहिती प्राप्त झाली होती. त्याअधारे त्याचेबाबत माहिती काढुन गुन्हयातील निष्पन्न व पाहिजे आरोपी अक्षय आंबादास सामलेटी, रा. गोदुताई नवीन घरकुल, घर नं. ४०१/३/क, कुंभारी, दक्षिण सोलापुर, जि. सोलापुर हा हडपसर रेल्वे स्टेशन, परिसरात सोलापुर वरुन रेल्वेने येणार असलेबाबत माहिती मिळाल्याने त्यास सापळा लाऊन त्यास ताब्यात घेण्यात आले त्यावेळी त्याचे ताब्यात चोरीची मोटार सायकल मिळुन आली होती. तसेच त्याचेकडे तपास करता अटक आरोपी व त्याचा साथीदार हे सोलापुर येथुन सोलापूर ते पुणे असा रेल्वेने प्रवास करुन पुणे शहरांत व त्या लगतच्या परिसरातून वेगवेगळया वेळी व ठिकाणी वाहनचोरीचे गुन्हे केलेले आहेत, तसेच सदरचे वाहन चोरी केलेनंतर सदर वाहनांचा वापर पुणे शहरांत घरफोडी चोरी करणेकामी ठिकाणांची टेहाळणी करणेकामी वापर करीत असलेबाबत सांगितल्याने त्यांचेकडुन एकुण ०६ मोटार सायकलचे गुन्हे, ३ घरफोडीचे गुन्हे व ०१ मोबाईल चोरीचे असे एकुण १० गुन्हे उघडकीस आले असुन त्यांचेकडुन एकुण उघकीस आले असुन एकुण ७,००,०००/- रु. कि.चा मुद्देमाल त्यामध्ये ५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, ३३ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, चार मोबाईल हॅन्डसेट व मोटार सायकली असे जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपीतांवर सोलापुर येथे घरफोडीचे व वाहनचोरीचे गुन्हे दाखल असुन ते रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. सदर आरोपीतांकडे एकुण १४ मोटार वाहने मिळालेले असुन त्यांचेबाबत तपास चालु आहे.

**सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, पुणे शहर श्री. अशोक मोराळे, मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. शिरिष सरदेशपांडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी वपोनि श्री.दत्ता चव्हाण, स.पो.निरी. संतोष तासगांवकर, पोलीस स्टाफ सपोफौज, अजय जाधव, संतोष मोहिते, प्रदीप सुर्वे, राजेश रणसिंग, दत्ता काटम, समीर शेख, राजाभाऊ भोरडे, केरबा गलांडे, संजय देशमुख, अमजद पठाण सचिन घोलप, प्रमोद घाडगे, दया शेगर, प्रमोद गायकवाड, अंकुश जोगदंडे, महेश वाघमारे, प्रविण काळभोर, मपोशि स्नेहल जाधव, संजयकुमार दळवी यांनी ही कामगिरी केलेली आहे.**

**युनिट ५, गुन्हे शाखा, पुणे शहर आयुक्तालय दिनांक १५/०६/२०१९**

**प्रेस नोट**

# हॉटेल पब यांनी कायद्याने उल्लघंन केले म्हणुन त्यांचेवर युनिट-५ गुन्हे शाखेनी केली कारवाई

---ooo---

पुणे शहरात युनिट-५ गुन्हे शाखा अधिकार क्षेत्रात असलेले हॉटेल, पब हे कायद्याने उल्लघंन करुन शर्तीपेक्षा जास्त वेळ उघडे ठेऊन स्वतःच्या आर्थिक फायद्येकरीता उघडे ठेवले तसेच हॉटेल पबमध्ये साऊंड बॉक्स लावुन मोठ मोठया आवाजात गाणी वाजवुन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असलेबाबत नागरिकांचे तक्रारी येत असल्याने मुंढवा व हडपसर पोलीस स्टेशन हद्दीत महारष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३(क्ष) सह १३१/१३४ प्रमाणे खालील प्रमाणे एकुण ०८ हॉटेल/पब वर कारवाई करण्यात आली आहे.

१) द हाऊस ऑफ मेडीची, हॉटेल वेस्टीन, मुंढवा
२) हॉटेल पेन्टहाऊस, मुंढवा
३) हॉटेल क्लब अलेरो, मुंढवा
४) हॉटेल मेट्रो, मुंढवा
५) हॉटेल अन वाइंड, मुंढवा
६) हॉटेल हेफ एनएन लाउंज, मुंढवा
७) हॉटेल प्ले बॉय,हडपसर,
८) हॉटेल क्युबा लिबरे, हडपसर

**सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, पुणे शहर श्री. अशोक मोराळे, मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. शिरिष सरदेशपांडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी वपोनि श्री.दत्ता चव्हाण, स.पो.निरी. संतोष तासगांवकर, पोउनि सोमनाथ शेंडगे, पोलीस स्टाफ प्रदीप सुर्वे, राजेश रणसिंग, दत्ता काटम, केरबा गलांडे, अमजद पठाण सचिन घोलप, प्रमोद घाडगे, दया शेगर, प्रमोद गायकवाड, अंकुश जोगदंडे, महेश वाघमारे, प्रविण काळभोर, संजयकुमार दळवी यांनी ही कामगिरी केलेली आहे.**